**विशेष दिवाणी दावा क्रमांक १३७/२०१८ मधील नि.क्र.२५ वरील आदेश**
**CNR No.MHSN02-01154-2018**

१. प्रतिवादी क्र.६ यांनी, त्यांच्या विरुध्द 'विना कैफियत' असा जो आदेश झालेला आहे, तो आदेश रद्द करुन मागण्याकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

२. वादी यांनी मुळ दावा करारपत्रावरुन दावा मिळकतीचे खरेदीपत्र होवून मिळणेसाठी व अन्य बाबींकरीता दाखल केलेला आहे. प्रस्तुत केसकामी प्रतिवादी क्र.६ यांना सर्व आवश्यक कागदपत्रे व माहिती वेळेत उपलब्ध न झाल्याने त्यांना विहीत मुदतीत कैफियत दाखल करता आली नाही असे कथन केले आहे. त्यामुळे त्यांच्या विरुध्द जो 'विना कैफियत' असा आदेश झालेला आहे तो आदेश रद्द करुन त्यांची कैफियत रेकॉर्डवर घेणेकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

३. सदर अर्जास अनुषंगिक वादी यांनी त्यांचे म्हणणे त्याच अर्जावर दाखल केलेले आहे. त्यांनी अर्ज फेटाळण्याची मागणी केलेली आहे.

४. प्रतिवादी यांनी त्यांच्या अर्जामध्ये त्यांना सर्व आवश्यक कागदपत्रे व माहिती वेळेत उपलब्ध न झाल्याने त्यांना विहीत मुदतीत कैफियत दाखल करता आली नाही असे शपथपूर्वक कथन केलेले आहे. अशा परिस्थीतीत सदरहु दावा गुणदोषावर चालण्याच्या दृष्टीने प्रतिवादी क्र.६ यांना कैफियत दाखल करणेत जरी उशीर झालेला असला तरी भविष्यातील दावे प्रतिदावे टाळण्याच्या दृष्टीने प्रतिवादी क्र.६ यांच्याविरुध्द झालेला विना कैफियत आदेश रद्द करून त्यांची कैफियत कोर्टात दाखल करण्यास मुभा देणे आवश्यक आहे. निर्वीवादपणे प्रतिवादी क्र.६ यांना कैफियत देण्यास ऊशीर झालेला आहे ही वस्तस्थिती आहे. परंतु जर प्रतिवादी क्र.६ यांना त्यांचा बचाव घेण्याची संधीच दिली नाही, तर सदर दावा गुणदोषावर निकाली होणार नाही. तसेच सदरहु दावा हा

अजुनही चौकशीला लागलेला नाही. त्यामुळे भविष्यातील दावे–प्रतिदावे टाळण्याच्या दृष्टीने प्रतिवादी क्र.६ यांचा अर्ज मंजूर करुन त्यांच्याविरुध्द झालेला 'विना कैफियत' आदेश रद्द करावा असे संयुक्तीक वाटते. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करणेत येत आहे.

## <u>आदेश</u>

१. प्रतिवादी क्र.६ यांचा नि.२५ कडील त्यांच्याविरुध्द झालेला दावा 'विना कैफियत' चालविण्याचा आदेश, रद्द करुन मागणीचा अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. अर्जाचे स्वरुप पाहता खर्चाबाबत आदेश नाही.

३. उभय पक्षकारांनी हुकुमाची नोंद घ्यावी.

**सही/––**

**सांगली.** **(अ. अ. मेहेंदळे)**

**दिनांक – ०८.०९.२०२१** **सहावे सह–दिवाणी न्यायाधीश व. स्तर, सांगली.**